## प्रकरण दुसरे

### अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि., अंकलखोप या संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमि आणि १९२२ ते १९७० या कालावधीतल पुनर्पाहणी

## प्रकरण दुसरे

## : विभाग पहिला :

### अंकलखोप सोसायटीची ऐतिहासिक पार्श्वभूमि

अंकलखोप हे गांव कृष्णा नदीचे काठी आहे. गावाच्या उत्तर, पूर्व आणि दक्षिण दिशेने कृष्णा नदी वाहते. गावची एकूण लागवडीखालील जमिन १७७८ हेक्टर इतकी आहे. नदीमुळे गावाला पाण्याची कायमस्वरूपी नैसर्गिक देणगी मिळाली आहे. अंकलखोप गावामध्ये १ जून,१९२२ ला अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.,अंकलखोप या संस्थेची स्थापना झाली.या काळामध्ये अंकलखोप गावची लोकसंख्या सर्वसाधारणपणे ३ ते ४ हजार इतकी होती. ही लोकसंख्या सर्वतोपरी शेतीवरच अवलंबून होती. गावच्या तिन्ही बाजूने कृष्णा नदी वाहत असल्यामुळे भरपूर पाणीपुरवठा, नदीकाठची सुपीक जमीन अशी नैसर्गिक देणगी असूनही बहुतांशी शेती ही कोरडवाहू स्वरूपाची होती.

संस्था स्थापन होणेपूर्वीच्या काळात गावातील शेतकरी आपली कर्जाची गरज गावातील ठराविक श्रीमंत सावकाराकडून कर्जाऊ रक्कम घेऊनच भागवित होते. कारण कर्ज मिळणेसाठी इतर कोणताही पर्याय गरीब लोक किंवा शेतकरी यांचेपुढे नव्हता. सावकाराकडून व्याजदर जास्त घेणे, फसवणूक करणे असे प्रकार होत होते. त्यामुळे अनेक गरीब शेतकरी सावकारी पाशामध्ये अडकत होते अशी त्या काळातील अवस्था होती. शेतक-याप्रमाणेच गावामध्ये लघुव्यवसाय, उद्योग करणा-या लोकांनाही कर्ज मिळण्याची सोय नव्हती त्यामुळे शेतकरी आणि कारागीर वर्ग आपला चरितार्थ जे उत्पादन मिळेल त्यावरच चालवित होते. शेती पूर्णपणे जिरायत स्वरूपाची कारण

नदीचे पाणी उचलण्याच्या सोयी नव्हत्या. तसेच शेतक-यामध्ये तसे करण्याची प्रवृतीही नव्हती. बागायती पिके किंवा शेतमाल यांच्या विक्रीचीही योग्य सोय नव्हती. कच्या मालावर प्रक्रिया करणारे कारखाने नव्हते. अशा अवस्थेमध्ये शेती आणि शेतकरी होता त्यामुळे योग्य त्या प्रमाणात त्यांची प्रगती होत नव्हती.

शेतक-यांची शेती व त्या अनुशंगाने इतर कर्जाची गरज भागविता यावी, असे कर्ज कमी व्याजदरामध्ये उपलब्ध करून देता यावे यासाठी सहकारी कायद्याखाली एका स्वतंत्र सहकारी पतसंस्थेची स्थापना करावी असे विचार गावातील कांही प्रमुख लोकांनी मांडली. त्यासाठी ते प्रयत्न करून लागले आणि त्यानी किरकोळ स्वरूपात २७५ रूपये इतके भागभांडवल जमा केले व १-६-१९२२ रोजी अंकलखोप सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. तेव्हा या संस्थेला सरकारच्या सहकार खात्याकडून ३८७२ हा नोंदणी क्रमांक मिळाला. या संस्थेच्या स्थापनेसाठी सुरूवातीस जे लोक पुढे आले ते म्हणजेच संस्थेचे प्रवर्तक मंडळ खालीलप्रमाणे होते:-

१) श्री. हिंदुराव सुबराव पाटील.
२) ,, बळी ज्ञानू पाटील.
३) ,, दत्तू तुकाराम पाटील.
४) ,, विष्णू सखाराम सुर्यवंशी
५) ,, गोविंद विठू तेली
६) ,, तुकाराम बाबाजी पाटील
७) ,, आकाराम नाथा चव्हाण
८) ,, केशव गणू सावंत
९) ,, ज्ञानू बाबाजी पाटील
१०) ,, शंकर रावजी चौगुले
११) ,, रामा गंगाधर चौगुले
१२) ,, दादा काशिबा यादव
१३) ,, ज्ञानू कृष्णा पाटील

१४) श्री.नाना शिदू पाटील
१५) ,, तुकाराम म्हादू चौगुले
१६) ,, कृष्णा धोंडी जंगम
१७) श्रीमती लक्ष्मीबाई सखाराम चौगुले
१८) श्री.बाळा खंडाप्पा परमाणे
१९) ,, बयाजी बापू गायकवाड
२०) ,, रावजी नरसिंग सुर्यवंशी
२१) ,, तुकाराम पाटलु पाटील
२२) ,, केशव बळी पाटील
२३) ,, ज्ञानू दत्तू पाटील
२४) ,, बाळा आण्णा कुंभोजकर
२५) ,, अहमंद बाबू तांबोळी
२६) ,, सदाशिव आप्पा पाटील
२७) ,, तात्या नारायण पाटील
२८) ,, बाबालाल दादा तांबोळी

वरील प्रवर्तक मंडळाचे नेतृत्व श्री.गोविंद विठू तेली यांचेकडे होते. त्यावेळी अंकलखोप हे गाव सातारा जिल्ह्यामध्ये होते आणि त्यावेळच्या सहकार खात्याच्या बेळगाव येथील असिस्टंट रजिस्ट्रार ऑफिसकडून या संस्थेची नोंदणी करण्यात आली होती. संस्था स्थापन झालेनंतर सुरूवातीचे काळामध्ये ५ सभासदांचे संचालक मंडळ होते. संस्थेच्या पहिल्या संचालक मंडळामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होता.

१) श्री.हिंदूराव सुबराव पाटील
२) श्री.अहमंद बापू तांबोळी
३) श्री.नारायण तुकाराम सुर्यवंशी
४) श्री.तुकाराम पाटलू पाटील
५) श्री.दादा कासम कुलकर्णी

या संस्थेच्या स्थापनेनंतर संस्थेचा सेक्रेटरी म्हणून श्री.हंबीर बाबाजी पाटील हे हिशोब व एकूण कारभार सांभाळू लागले.

## विभाग दुसरा

### सन १९२२ ते १९४० या काळातील अंकलखोप सहकारी पतसंस्थेची प्रगती

अंकलखोप गांवची म्हणजे संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण १७७८ हेक्टर इतकी जमीन फक्त जिराईत शेतीखाली होती. आणि ती सर्वस्वी पावसावर अवलंबून होती. फक्त अन्नधान्याची पिकेच घेतली जात होती. त्यामुळे या संस्थेकडून फक्त जिराईत पिकासाठी कर्ज पुरविले जात होते. सभासदाकडून कर्ज घेण्यासाठी पुरेसा प्रतिसाद नव्हता त्यामुळे संस्थेकडून दिल्या जाणा-या कर्जाची रक्कम अत्यंत कमी होती. सन १९२२ ते १९२५ चे दरम्यान सर्वसाधारण व गरीब शेतकरी कर्जापासून दूर असे. अत्यंत गरज पडली तरच कर्ज काढले जात असे. सावकारी कर्जाच्या अनुभवामुळे कर्ज काढणे हे कमीपणाचे मानले जात होते. कर्जाबाबतच्या अशा परिस्थितीमुळे सभासद सोसायटीचे कर्ज मिळत असूनही ते घेण्यास नकार दर्शवित असत. यामुळे सुरुवातीचे काळात कर्जव्यवहार मोठया प्रमाणात वाढले नाहीत.

संस्थेचे १९२२ ते १९४० या काळातील कांही वर्षे सोडता इतर वर्षाचे वार्षिक अहवाल उपलब्ध झाले. परंतु सध्याच्या काळातील सहकारी संस्थांच्या अहवालासारखे त्यांचे स्वरूप नाही. त्या काळामधील मुंबई इलाख्याचे, सहकारी खात्याचे रजिस्ट्रार श्री.आर.बी.यूबँक यांचे नांवे २० डिसेंबर १९१९ ला छापलेले सहकारी संस्थांचे वार्षिक पत्रक सर्वत्र सारखेच असावे. या छापील वार्षिक पत्रकात सहकारी संस्थेचा जमाखर्च व इतर हिशेब पत्रके, यांचा नुमना आहे व त्या नमुन्याबरहुकूम छापील वार्षिक पत्रकात सहकारी संस्थानी आपल्या कामकाजाची माहिती व हिशेब भरावयाचे होते. यामध्ये दरवर्षीचे ३१ मार्च अखेरचे नफातोटा, जमाखर्च, जिंदगी व कर्जे याबद्दलची माहिती भावी लागत असे.

भारतात सर्वत्र सहकारी संस्थांचेसाठी तत्कालीन ' हिंदूस्थान सरकारने एकसारखा नमुना तयार केलेला होता.

अशाप्रकारच्या वार्षिक पत्रकाचे स्वरूप सध्याच्या अहवालासारखे नाही. कारण त्यामध्ये हिशोब पत्रकाशिवाय संस्थेविषयी, संस्थेच्या कार्याविषयीची तसेच कार्यक्षेत्र, सभासद, भागभांडवल इ.संबंधीची महत्वाची माहिती उपलब्ध नाही. संस्थेचे संचालक मंडळ, चेअरमन, यांचेबाबत माहिती मिळत नाही. उपलब्ध आकडेवारी व इतर माहिती खालील मुद्दानुसार दर्शवित आहे:-

१) सभासदसंख्या
२) भागभांडवल
३) सभासदांच्या व बिगर सभासदांच्या ठेवी
४) संस्थेचे राखीव व इतर निधी
५) सभासदाना केलेला कर्जपुरवठा
६) बँकाकडून घेतलेले कर्ज
७) संस्थेचे खेळते भांडवल
८) संस्थेला व्यवहारातून मिळालेला नफा

सन १९२२ ते १९५० या काळामध्ये संस्थेच्या सुरूवातीचे म्हणजे १९२२-२३ व १९२३-२४ या वर्षाचे वार्षिक पत्रक मिळाले नाही. तसेच पुढे १९२७-२८, १९२९-३०, १९३८-३९ या वर्षाची आर्थिक माहिती कागदपत्राशिवाय मिळू शकली नाही. उपलब्ध माहितीनुसार संस्थेची प्रगती पुढीलप्रकारे दाखविता येते.

१) सभासदसंख्या:

अंकलखोप सहकारी पतसंस्था, अंकलखोप या संस्थेची स्थापना करीत असताना एकूण २८ इतके सभासद होते.१ जून १९२२ रोजी संस्थेची स्थापना झाली.

या सभासदानी संस्थेची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यानंतर पुढील कालावधीमध्ये संस्थेची सभासदसंख्या वाढत गेली. संस्थेच्या सभासदामध्ये सर्व जाती-धर्माच्या लोकांचा समावेश दिसून येतो. हिंदू, मुसलमान, जैन यासह इतरही लोक आपल्या समान आर्थिक कल्याणासाठी या संस्थेच्या सभासदाच्या रूपाने एकत्रित आले आहेत.

या पतसंस्थेच्या सभासदामध्ये बहुतांश सभासदांचा शेती हाच व्यवसाय आहे. शेतीला मिळणा-या कर्जपुरवठा व इतर सोयी यासाठी ते एकत्रित आले होते.शेतीशिवाय व्यापार व कारागीरी व्यवसाय करणारे लोकही सभासद होते. अंकलखोप गावातील श्रीमंत शेतकरी, जमीनदार तसेच गरीब शेतकरी असा आर्थिकदृष्टया भिन्न गटातील लोक सभासद होते.पुढील तक्त्यावरून सभासदसंख्येबाबतची माहिती मिळते.

तक्ता क्रमांक २.१

: सभासदसंख्या :

| वर्ष | सभासदसंख्या |
|---|---|
| सन १९२४-२५ | ६४ |
| सन १९२५-२६ | ७६ |
| सन १९२६-२७ | ७५ |
| सन १९२८-२९ | ५६ |
| सन १९३०-३१ | ४२ |
| सन १९३१-३२ | ४२ |
| सन १९३२-३३ | ४४ |
| सन १९३३-३४ | ४१ |
| सन १९३४-३५ | ४० |

| वर्ष | सभासदसंख्या |
|---|---|
| सन १९३५-३६ | ३९ |
| सन १९३६-३७ | ४० |
| सन १९३७-३८ | ३७ |
| सन १९३९-४० | ३५ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते १९२५-२६ पर्यंत सभासदसंख्या झपाट्याने वाढत गेलेली आहे परंतु नंतर मात्र सलग १९३९-४० पर्यंत कमी कमी होत आलेली आहे. सन १९२२ ला २८ असलेली सभासदसंख्या १९२५-२६ ला ७६ इतकी झालेली आहे. १९२६-२७ यावर्षी एक सभासद कमी झाला. सन १९२८-२९ ला हीच संख्या ५६ इतकी झाली. १९३६-३७ ला पूर्वीपेक्षा एक सभासद वाढला. सभासदांचे संस्थेविषयीचे आकर्षण कमी झाल्यामुळे १९३९-४० पर्यंत ही सभासदसंख्या फक्त ३५ इतकीच राहिल्याचे दिसून येते.

२) भागभांडवल:

संस्था स्थापन करतेवेळी रु.२७५-०० इतके भागभांडवल जमा केलेले होते. त्या काळातील उपलब्ध वार्षिक पत्रकामध्ये भागभांडवलाबाबत फारशी माहिती नाही. १९२५-२६ ला सभासदाना २० रूपयाचे भाग विकले गेले होते. तसेच संस्थेने " दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली " या बँकेच्या ५० रु.चा भाग खरेदी केल्याचा उल्लेख आहे. १९२८-२९ च्या वार्षिक पत्रकातील माहितीप्रमाणे एकूण ५६ सभासदापैकी ६ सभासद मुस्लीम धर्मिय होते. तसेच " दि वारणा व्हॅली सहकारी संस्थेचा " रु.१००-०० चा शेअर खरेदी केलेला होता.

सन १९३६-३७ यावर्षी संस्थेचे भाग भांडवल रू.८०५-०० इतके होते आणि ५५ रू.चे शेअर्स परत घेतलेले होते. म्हणजेच भागभांडवलाबाबत १९३९-४० पर्यंतची प्रगती फारशी समाधानकारक नव्हती. या काळात संस्थेची सभासदसंख्या कमी झालेली होती. अनेक सभासदांनी संस्थेकडील आपले भाग भांडवल परत घेतले त्यामुळे भागभांडवलामध्ये अपेक्षित वाढ होऊ शकली नाही.

३) समासद व बिगर सभासदांच्या ठेवी:

ठेवी मिळवणेबाबत संस्थेने सुरूवातीपासून प्रयत्न केल्याचे दिसते. संस्थेने गावातील सभासद व्यक्तीकडून त्याचप्रमाणे जे लोक सभासद नाहीत त्यांच्याकडून सुध्दा ठेवी मिळविलेल्या दिसून येतात. संस्थेकडे असणाऱ्या कायम ठेवीवर त्या काळामध्ये संस्था ६१/४ टक्के इतका आकर्षक व्याजदर देत होती. त्यामुळेही संस्थेकडे ठेवी आकर्षित झाल्या असाव्यात. ठेवीतील वाढ पुढील तक्त्यावरून कळते:-

तक्ता क्रमांक २.२: संस्थेच्या ठेवी

(आकडे रूपयात)

| वर्ष | ठेवी | | एकूण ठेव |
|---|---|---|---|
| | सभासदांच्या | बिगर सभासदांच्या | |
| १९२४-२५ | १५२० | - | १५२० |
| १९२५-२६ | २१८८ | - | २१८८ |
| १९२६-२७ | २५६९ | - | २५६९ |
| १९२८-२९ | २४५२ | - | २४५२ |
| १९३०-३१ | २६६८ | - | २६६८ |
| १९३१-३२ | २९८३ | - | २९८३ |
| १९३२-३३ | ३२२१ | - | ३२२१ |
| १९३३-३४ | ३९६७ | २५० | ४२१७ |
| १९३४-३५ | ४१०६ | २५० | ४३५६ |
| १९३५-३६ | ३०४२ | २५० | ३२९२ |
| १९३६-३७ | २००१ | २५० | २२५१ |
| १९३७-३८ | १७७१ | २८५ | २०५६ |
| १९३९-५० | १३१५ | २८५ | १६०० |

तक्त्यातील आकडेवारीवरून सभासदांच्या ठेवी १९३४-३५ पर्यंत सतत वाढत गेल्याच्या दिसतात. मात्र बिगर सभासदांच्या ठेवी संस्थेला १९३३-३४ पासूनच मिळाल्या आहेत. १९३४-३५ नंतर एकूण ठेवींची रक्कम कमी होत गेली आहे. ठेव कमी होण्याचे प्रमुख कारण म्हणजे कांही सभासदांनी कर्ज घेण्याऐवजी संस्थेकडील आपली ठेव परत घेतली. उदा. १९३५-३६ ला सभासदानी रू.१२१७-०० च्या ठेवी परत घेतल्या आहेत. तसेच १९३६-३७ ला रू.११५०-०० इतक्या ठेवी काढून घेतल्या यामुळे संस्थेकडील ठेवी कमी झाल्या आहेत. तरीसुध्दा १९२४-२५ ते १९३४-३५ या १० वर्षाच्या काळात संस्थेकडील ठेवीमध्ये रू.१५२०-०० पासून रू.४३५६-०० पर्यंत वाढ झालेली आहे.

४) संस्थेचे निधी:

अंकलखोप सहकारी पतसंस्थेकडे १९४० पर्यंतच्या काळात राखीव निधीशिवाय इतर कोणत्याही प्रकारचा निधी निर्माण केलेला नव्हता. कायद्यातील तरतूदी-नुसार संस्थेच्या आर्थिक सुरक्षिततेकरीता राखीव निधी निर्माण केल्याचे दिसते. तसेच राखीव निधीसाठी असणा-या रकमेचा वापर कांहीवेळा इतर कार्यासाठी केल्याचेही दिसून येते. १९४० पर्यंत संस्थेच्या राखीव निधीमध्ये झालेली वाढ पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

तक्ता क्रमांक २.३

: संस्थेचे राखीव निधी :

| वर्ष | राखीव निधी रूपये | वर्ष | राखीव निधी रूपये |
|---|---|---|---|
| १९२४-२५ | २३ | १९३३-३४ | १८४२ |
| १९२५-२६ | ९७ | १९३४-३५ | १८४२ |
| १९२६-२७ | १२२५ | १९३५-३६ | १८४२ |
| १९२८-२९ | ८७७ | १९३६-३७ | १८४२ |
| १९३०-३१ | १०८० | १९३७-३८ | २३५५ |
| १९३१-३२ | १७०६ | १९३९-४० | २३५५ |
| १९३२-३३ | १७०६ | | |

यावरून असे दिसते की १९२४-२५ मध्ये राखीव निधी फक्त २३ रु. होता. तोच १९२६-२७ यावर्षी १२२५ रु.इतका झाला आहे. १९३१-३२ आणि १९३२-३३ यावर्षी राखीव निधी १७०६ रु.आहे. तर १९३३-३४ ते १९३६-३७ या चार वर्षामध्ये १८४२ रु.इतकाच स्थिर राहिल्याचे दिसते म्हणजे त्यामध्ये कांहीही वाढ नाही. १९३७-३८ पासून १९३९-४० पर्यंत राखीव निधी २३५५ रु. इतका आहे. राखीव निधीची रक्कम संस्था इतर कांही कार्याकरीता वापर करीत होती व नंतर अशी रक्कम राखीव निधीमध्ये जमा केली जाई. त्यामुळे ठराविक वर्षातच राखीव निधी वाढला आहे. १९३० ते १९४० या दाहा वर्षामध्ये राखीव निधीच्या एकूण रकमेमध्ये सुमारे दोन पटीने वाढ झालेली आहे.

५) <u>संस्थेचा कर्जपुरवठा:</u>

अंकलखोप सहकारी पतसंस्था आपल्या सभासदाना सुरूवातीपासूनच कर्जपुरवठा करीत आहे. एकूण कर्जपुरवठयामध्ये शेतक-यांना दिलेला कर्जपुरवठा मोठया प्रमाणात आहे . १९२२ ते १९४० या काळामध्ये सभासदांची बहुतेक शेती जिराईत स्वरूपाची होती त्यामुळे अशा जिराईत पिकांच्या खर्चासाठी सभासद कर्जमागणी करीत परंतु एकूण कर्जरकमेची मागणी कमीच होती. सभासदाना दिल्या जाणा-या कर्जाबरोबरच तत्कालीन काळात संस्था इतर मंडळीना (सहकारी संस्थाना) करंट खातेनुसार कर्जपुरवठा करीत होती असे उपलब्ध वार्षिक पत्रकावरून दिसून येते. १९२४-२५ ते १९३९-४० या काळात संस्थेने केलेला एकूण कर्जपुरवठा पुढील तक्त्यावरून दाखविला आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

## तक्ता क्रमांक २.४

## -: संस्थेचा कर्जपुरवठा :-

(आकडे रूपयात )

| वर्ष | कर्जपुरवठा समासदाना | कर्जपुरवठा इतर (करंटखाते) | इकूण |
|---|---|---|---|
| १९२४-२५ | ७५८० (७०.३१) | ३२०० (२९.६९) | १०७८० (१००.००) |
| १९२५-२६ | ११८४६ (७९.७८) | ३००२ (२०.२२) | १४८४८ (१००.००) |
| १९२६-२७ | १२२४० (६४.०७) | ६८६५ (३५.९३) | १९१०५ (१००.००) |
| १९२८-२९ | ६४१० (५०.०६) | ६३९४ (४९.९४) | १२८०४ (१००.००) |
| १९३०-३१ | ६४९५ (४९.७२) | ६५६७ (५०.२८) | १३०६२ (१००.००) |
| १९३१-३२ | ५१९० (४७.०९) | ५८३१ (५२.९१) | ११०२१ (१००.००) |
| १९३२-३३ | ४३०५ (५१.९१) | ३९८९ (४८.०९) | ८२९४ (१००.००) |
| १९३३-३४ | ५०३० (४९.२४) | ५१८६ (५०.७६) | १०२१६ (१००.००) |
| १९३४-३५ | १०६९० (४७.९२) | ११६१६ (५२.०८) | २२३०६ (१००.००) |
| १९३५-३६ | ३०२० (४९.०९) | ३१३२ (५०.९१) | ६१५२ (१००.००) |
| १९३६-३७ | २१३० (६१.८५) | १३१४ (३८.१५) | ३४४४ (१००.००) |
| १९३७-३८ | ५५३ (२८.४२) | १३९३ (७१.५८) | १९४६ (१००.००) |
| १९३९-४० | ५६० (१००) | - | ५६० (१००.००) |

कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.

सन १९२४-२५ ते १९३९-४० या काळामधील अंकलखोप सहकारी पतसंस्थेचा कर्जपुरवठा वरील तक्त्यावरून दिसू येतो. १९२४-२५ ला १०७८० रू.इतका एकूण कर्जपरवठा होता तो १९२६-२७ ला १९१०५ रू.इतका झाला आहे. परंतु त्यानंतर १९३२-३३ पर्यंत यामध्ये वाढ न होता उलट घटच झालेली आहे. १९३२-३३ मध्ये फक्त ८२९४ रू.इतका एकूण कर्जपुरवठा आहे. १९३४-३५ ला तोच २२३०६ रू. इतका झाला आहे म्हणजे सुमारे २$\frac{१}{२}$ पटीने वाढला आहे. पुन्हा १९३९-४० पर्यंत पुढील ४-५ वर्षामध्ये दरवर्षी दिला जाणारा कर्जपुरवठा अत्यंत कमी होऊ लागल्याचे दिसते. १९३९-४० या वर्षी फक्त ५६० रू. इतकाच कर्जपुरवठा आहे. सर्वसाधारणपणे संस्थेकडून दिला जाणारा कर्जपुरवठा सदर काळात एकूण कर्जपुरवठयाच्या सरासरी ५० टक्के सभासदाना व ५० टक्के करंट खातेनुसार दिला जात होता.

६) बँकेकडून घेतलेले कर्ज:

सध्याप्रमाणेच पूर्वीही सहकारी पतसंस्था मध्यवर्ती सहकारी बँकेतून आवश्यक ती कर्जे घेत होत्या. मध्वर्ती बँकेकडून १९२२ ते १९४० या काळात पुढीलप्रकारे कर्ज अंकलखोप सहकारी पतसंस्थेने घेतली.

तक्ता क्रमांक २.५

-: संस्थेने घेतलेली कर्जे :-

| वर्ष | घेतलेले कर्ज | वर्ष | घेतलेले कर्ज |
|---|---|---|---|
| | रू. | | रू. |
| १९२४-२५ | ६७००-०० | १९३४-३५ | ३७९२-०० |
| १९२५-२६ | ८२१४-०० | १९३५-३६ | २६१९-०० |
| १९२६-२७ | ८८५०-०० | १९३६-३७ | ६१५-०० |
| १९२८-२९ | ७९४८-०० | १९३७-३८ | - |
| १९३०-३१ | ३९३०-०० | १९३९-४० | - |
| १९३१-३२ | ३९६७-०० | | |
| १९३२-३३ | २३१९-०० | | |
| १९३३-३४ | १९२८-०० | | |

१९२४-२५ साली संस्थेने ६७०० रु.कर्ज घेतले होते. १९२६-२७ ला ८८५ रु. इतके कर्ज घेतले यावरून कर्जाची गरज वाढती आहे असे दिसून येते. परंतु नंतर मात्र प्रतिवर्षी कमी प्रमाणात कर्ज घेतल्याचे दिसते. १९३०-३१ यावर्षी ३९३० रु.इतके कर्ज तर १९३३-३४ यावर्षी १९२८ रु.इतके कर्ज होते. १९३६-३७ ला ६१५ रु.इतकेच फक्त कर्ज घेतलेले दिसून येते. पुढील दोन वर्षे संस्थेने बँकेचे कर्ज घेतले नव्हते. याच काळात संस्थेची सभासदसंख्याही फारच कमी झालेली आहे. त्याचाही परिणाम कर्जमागणीवरती झाला असावा. त्यामुळे स्वत:कडील भांडवलामधूनच संस्थेने कर्जे दिली असावीत. त्यामुळे संस्थेला मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेण्याची गरज भासली नसावी असे दिसते.

७) खेळते भांडवल:

अंकलखोप सहकारी पतसंस्थेचे सुरुवातीचे खेळते भांडवल बरेच कमी होते. शेअर विक्री जास्त नसल्याने भागभांडवल कमी होते. बरेच भागभांडवल वसूल व्हावयाचे होते. सभासद व बिगर सभासदाकडील मिळालेल्या ठेवी बँकेकडून घेतलेले कर्ज, मिळालेले व्याज, प्रवेश फी व देणग्या या सर्वांचा समावेश खेळत्या भांडवलात केला जातो. १९२२ पासून संस्थेच्या खेळत्या भांडवलात १९३४ पर्यंत सतत वाढ होत आलेली आहे परंतु १९४० पर्यंत पुढील ५-६ वर्षामध्ये हे खेळते भांडवल पूर्वीपेक्षा फारच वेगाने कमी झाले आहे ते पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

तक्ता क्रमांक २.६

-: संस्थेचे खेळते भांडवल :-

| वर्षे | खेळते भांडवल रु. | वर्षे | खेळते भांडवल रु. |
|---|---|---|---|
| १९२४-२५ | १२५४१-०० | १९३३-३४ | १५३१८-०० |
| १९२५-२६ | ३३३०८-०० | १९३४-३५ | २८३५६-०० |
| १९२६-२७ | २१११७-०० | १९३५-३६ | १०६४१-०० |
| १९२८-२९ | २४३५४-०० | १९३६-३७ | ६९२३-०० |
| १९३०-३१ | १९५४६-०० | १९३७-३८ | ३२९०-०० |
| १९३१-३२ | १६२९३-०० | १९३९-४० | २१३८-०० |
| १९३२-३३ | ११८७१-०० | | |

१९३५ पासून खेळते भांडवल कमी झालेले आहे. त्याची महत्वाची कारणे म्हणजे अनेक सभासदानी आपल्या ठेवी संस्थेमधून काढून घेतल्या, कर्जाची मागणी कमी असल्याने मध्यवर्ती बँकेकडून कर्ज कमी प्रमाणात घेतले आहे. १९३८ ते १९४० या दोन वर्षात तर असे कर्ज संस्थेने घेतलेच नाही. परिणामत: संस्थेचे व्याजाचे उत्पन्नही अत्यंत कमी राहिले. या सर्व कारणामुळे खेळते भांडवल अत्यंत कमी झाले असल्याचे दिसते.

१९३४-३५ यावर्षी खेळते भांडवल २८३५६ रू.इतके होते तेच १९३५-३६ साली १०६४१ रू.पर्यंत कमी झाले पुढे १९३७-३८ ला ३२९० रू. तर १९३९-४० ला २१३८ रू.इतके खेळते भांडवल कमी झाले आहे (तक्ता क्रमांक २.६).

८) संस्थेला व्यवहारातून मिळालेला नफा:

अंकलखोप सहकारी पतसंस्थेचा व्यवहार १९२२ ते १९४० या कालात फक्त कर्जव्यवहारापुरताच मर्यादीत होता. स्वत:चे भांडवल व बँकेकडून घेतलेले कर्ज यामधून सभासदाना गरजेनुसार कर्जपुरवठा केला जात होता. या व्यवहारातून मिळणा-या व्याजामधून संस्थेचा फायदा निर्माण होत होता. १९२४-२५ यावर्षी संस्थेचा नफा फक्त १७ रू.इतकाच होता. मात्र पुढील काळात संस्थेचे कर्जव्यवहार वाढत गेल्याने संस्थेच्या नफ्यावरही परिणाम होऊन वाढ होत गेली आहे. १९२६-२७ यावर्षी संस्थेला ११२७ रू. इतका नफा झाला. हा नफा १९२२ ते १९४० या काळामध्ये सर्वोच्च आहे. याचवर्षी इतका नफा वाढण्याचे कारण म्हणजे सभासदसंख्या जास्त होती. त्यांचेकडून कर्जाची मोठी मागणी होती त्यामुळे संस्थेने याच वर्षी जास्त कर्जपुरवठा केलेला आहे. त्यामुळे व्याजरूपाने उत्पन्न जास्त मिळाले आहे.

१९२८-२९ नंतर १९३९-४० पर्यंत इतर सर्व व्यवहारांच्या कमतरतेमुळे संस्थेचे उत्पन्नही कमी राहिले. त्यामुळे संस्थेचा एकूण नफाही कमी होत

राहीला. या काळात कर्जाशिवाय इतर कोणताही व्यवसाय संस्था करीत नव्हती. त्यामुळे नफा कमी राहीला. १९३०-३१ यावर्षी फक्त २०२ रु. इतकाच नफा आहे. १९३४-३५ यावर्षी ७७ रु., १९३५-३६ साली ४६१ रु. इतका नफा आहे. १९३७-३८ ला फक्त ३८ रु. इतकाच नफा आहे. तो भागभांडवलाच्या ४.७२ टक्के इतका आहे.

अंकलखोप सहकारी पतसंस्थेची आर्थिक परिस्थिती १९४० पर्यंत वरील प्रकारे जेमतेम होती. संस्थेला मिळणारा निव्वळ नफा बहुतांशी संस्थेच्या राखीव निधीमध्ये जमा केला जात होता. १९२८-२९ पर्यंत संस्थेची आर्थिक प्रगती झाली, सभासद वाढले परंतु पुढील काळात मात्र प्रगतिचा वाढीचा वेग न वाढता कमीच होऊ लागला. १९४० पर्यंत संस्थेच्या मालकीची स्वत:ची इमारतही नव्हती. कर्जपुरवठयाशिवाय इतर कोणतेही व्यवहार संस्थेकडून केले जात नव्हते.

## विभाग तिसरा

### -: १९४० ते १९६० या कालखंडातील विकास :-

सन १९४० ते १९६० याकाळातील अंकलखोप सहकारी पतसंस्थेची आर्थिक परिस्थिती, प्रगती किंवा विकास आणि व्यवहार पाहणेसाठी कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. या काळमधील कोणत्याही वर्षाचा संस्थेचा अहवाल संस्थेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे निश्चितरित्या सर्वच आर्थिक व्यवहार कशाप्रकारे होते हे सांगता येत नाही. अंकलखोप गावातील संस्थेशी संबंधित होते अशा कांही लोकांचेकडून याबाबत माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला, त्यावरुन सर्वसाधारणपणे अंकलखोप सहकारी पतसंस्थेचीपरिस्थिती पुढीलप्रकारे होती. या काळमध्ये दोन भाग करुन ही माहिती थोडक्यात सांगता येईल.

१) सन १९४० ते १९५० चा कालखंड:

सन १९४० पर्यंत अंकलखोप सहकारी पतसंस्थेचे बरेचसे आर्थिक व्यवहार कमी झालेले होते हे मागील आकडेवारीवरून दिसून येते. हीच परिस्थिती पुढील काळात कमी-अधिक प्रमाणात होती. सभासद संख्येमध्ये पाहिजे त तिकी वाढ झाली नाही. त्यामुळे संस्थेचे भागभांडवल कमी राहिले. मात्र १९४२ पासून कर्जमागणीचे प्रमाण वाढले परिणामी मध्यवर्ती बँकेकडून जास्त प्रमाणात कर्ज घेऊन त्याचे वाटप करण्याचे कार्य संस्थेने केले. १९४६ पर्यंत हीच परिस्थिती होती. या काळामध्ये थकबाकीचे प्रमाण जवळ जवळ शून्य होते, कारण शेतमालास चांगला दर मिळत गेल्याने सभासद शेतक-यांना शेतीपासून चांगले उत्पन्न मिळाले.

सन १९५० अखेर सभासदसंख्या वाढू लागली होती. त्यामुळे भागभांडवल वाढू लागले. या सहकारी पतसंस्थेकडे अंकलखोप गावामधील गरीब शेतकरी व इतर वर्गही आकर्षित झाला. त्यानाही संस्थेकडून कर्जाच्या सुविधा मिळू लागल्या. पर्यायाने संस्थेमुळे त्यांचा फायदा झाला.

२) सन १९५० ते १९६० चा कालखंड:

सन १९५० नंतरचे काळामध्ये संस्थेची थोडीफार प्रगती होऊ लागली. १९५६-५७ पर्यंत अंकलखोप सहकारी पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये फक्त जिराईत पिकेच घेतली जात होती. त्यामुळे संस्थेकडून केल्या जाणा-या कर्जपुरवठयात फार मोठी वाढ होत नव्हती. संस्थेचे इतर सर्वच व्यवहार पूर्वीसारखे होते. ठेवी व निधीमध्येही जास्त वाढ नव्हती त्यामुळे संस्थेला होणारा नफाही अत्यंत मर्यादित असाच होता. १९५७-५८ साली संस्थेला रु.५०००-०० इतके सरकारी भागभांडवल मिळाले. त्यामुळे भागभांडवल वाढण्यास फार मोठी मदत झाली.

सन १९५६ पासून " शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,सांगली " हा साखर कारखाना उभारणीचे काम चालू होते. या कारखान्याचे कार्यक्षेत्रामध्ये अंकलखोप या गांवाचा समावेश करण्यात आला. १९५८ साली साखर कारखान्याचे शेअर्स संस्थेच्या सभासदांनी खरेदी करावेत यासाठी सभासदांचेवर सक्ती करण्यात आली. साखर कारखान्याचा शेअर खरेदी करण्यासाठी संस्थेने सभासदांना मध्यम मुदत कर्ज पुरविले.

अशात-हेने अंकलखोप सहकारी पतसंस्थेचे सभासद साखर कारखान्याचेही सभासद बनले. पूर्वीची जिराईत पिके कमी होऊन सभासद ऊस उत्पादनाकडे वळले. कच्या मालाच्या (उसाच्या) विक्रीची योग्य व्यवस्था झाली. ऊस उत्पादनासाठी सभासदाना जादा कर्जाची गरज भासू लागली. त्यामुळे कर्ज काढणेसाठी बहुतेक सभासदांनी संस्थेकडे धाव घेतली. पोट नियमानुसार कर्ज काढणेच्या मर्यादेपेक्षा जादा कर्जाची आवश्यकता जाणवू लागली. यासाठी संस्थेचे भागभांडवल व ठेवी यामध्ये वाढ होण्याची गरज होती. भांडवल वाढावे म्हणून सभासदांना दिल्या जाणा-या कर्जातून १९५८ पासून १० टक्के प्रमाणे शेअर रक्कम कपात करणेस प्रारंभ करणेत आला. परिणामी पुढे संस्थेचे भागभांडवलात वाढ होऊ लागली. तसेच सभासदांची ऊसाची बिले संस्थेमार्फत सभासदाना देण्यात येऊ लागली. या बिलामधूनही सभासदांचेकडून ठेव म्हणून कांही रक्कम संस्था स्वीकारू लागली. यामुळेही संस्थेच्या ठेवीमध्ये वाढ झाली. संस्थेचे एकूण खेळते भांडवल वाढण्यास मदत झाली.

ऊस उत्पादक सभासदाना ऊस उत्पादनासाठी जादा कर्जाची आवश्यकता होतीच. परंतु रासायनिक खतांचीही गरज होती. अशी खते सभासदांना उपलब्ध करून देणेसाठी १९६० चे दरम्यान संस्थेने स्वतंत्र खत विभाग चालू केला. त्या काळात वीजपुरवठा नव्हता त्यामुळे कृष्णा नदीवर ऑईल इंजिन्स बसवून त्याव्दारे ऊसाला पाणीपुरवठा केला जात होता. कित्येक

सभासद व बिगर सभासदांची अशी ऑईल इंजिन्स होती. त्यासाठी आवश्यक असणारे इंधन क्रुडाईल, डिझेल इत्यादि तेलांची गरज सभासदांना भासू लागली. ही गरज भागविणेसाठी संस्थेने सन १९६० चे दरम्यान स्वतंत्र असा तेल विभागही चालू केला व त्यामधून तेल व इतर इंधनाची गैरसोय दूर करण्यात आली. संस्थेचे व्यवहार असे वाढत चालले. यामधून संस्थला चांगला नफाही मिळू लागला. या काळापर्यंत संस्थेकडे स्वतःच्या मालकीची इमारत व गोडावून नव्हते. त्यासाठी स्वतंत्र निधी जमविण्यात येऊ लागला.

अशात-हेने १९५७-५८ नंतरचे काळामध्ये अंकलखोप सहकारी पतसंस्थेची प्रगती होऊ लागली. याबरोबरच संस्थेचे पतसंस्था हे स्वरूप हळूहळू नष्ट होऊ लागले व त्याचे रूपांतर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमध्ये झाले.

सन १९५८-५९ व १९५९-६० या दोन वर्षातील संस्थेची प्रगती पुढील तक्त्यावरून कळून येईल.

तक्ता क्रमांक २.७

-: संस्थेची प्रगति :-

(आकडे रुपयात)

| | तपशील | १९५८-५९ | १९५९-६० |
|---|---|---|---|
| १) | सभासद संख्या | ११५ | १७५ |
| २) | भागभांडवल | २०८४५ रू. | २८९७५ रू. |
| ३) | ठेवी | ३६१८ रू. | १२८१ रू. |
| ४) | बँक कर्ज | ४२७१७ रू. | १०५८८१ रू. |
| ५) | कर्जपुरवठा | ५६२५५ रू. | १२१६८७ रू. |
| ६) | कर्जवसुली | ३०३६१ रू. | ७६१४१ रू. |
| ७) | गुंतवणूक | ४३५० रू. | ४९५० रू. |
| ८) | नफा | २५१ रू. | ७७६ रू. |

## विभाग चौथा

### -: सन १९६० ते १९७० या काळातील प्रगती :-

सन १९५८ पासून ख-या अर्थाने अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.,अंकलखोप या संस्थेच्या विकासाची सुरूवात झाली. संस्थेच्या सभासद संख्येबरोबरच सर्व आर्थिक व्यवहार वाढू लागले. सन १९६० नंतर प्रगतीस जास्त चालना मिळाली. सभासदांची ऊस उत्पादनासाठी कर्जाची मागणी मोठया प्रमाणात वाढली. परिणामत: कपातीव्दारे भागभांडवलही वाढू लागले. कर्जपुरवठयाशिवाय इतर व्यवहारही संस्थेने हाती घेतले. त्यामुळे संस्थेच्या एकूण कामाची मर्यादा वाढली.

या संस्थेचे चेअरमन म्हणून १९६० पासून श्री.दिनकरराव हिंदूराव पाटील काम पाहू लागले. त्यांचे सहकारी श्री.दत्ताजीराव भाऊराव सुर्यवंशी तसेच श्री.नरसू कृष्णा सुर्यवंशी यानीही संस्थेच्या कामकाजामध्ये लक्ष घातले. अशा निष्ठावंत सहकारी कार्यकर्त्यांनी पुढील काळात या संस्थेची फार मोठी वाढ केली. तसेच संस्थेचे मुख्य सचिव म्हणून श्री.जिनाप्पा भाऊ चौगुले हे १९७० पर्यंत व्यवस्थापन कार्य करीत होते. त्यानीही संस्थेच्या विस्तार कार्यात अत्यंत चांगल्याप्रकारे सहभाग घेतला व कर्जपुरवठयाशिवाय इतर विभागांचाही पाया योग्यत-हेने घातला.

सन १९६० पासूनचे संस्थेचे संपूर्ण अहवाल उपलब्ध झाले त्यामुळे संस्थेच्या प्रगतिविषयीची निश्चत माहिती मिळाली. तसेच संस्थेच्या स्वतंत्र अहवालाचे स्वरूपही योग्य आणि विस्तृत असे आहे. १९५९ पासून अंकलखोप विविध कार्यकारी संस्थेला ऑडिट वर्ग हा नेहमीच " अ " वर्गामध्ये मिळाला आहे. तसेच या संस्थेच्या कार्यावर, तासगांव तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन लि.,तासगांव यांची देखरेख होती. सन १९६१ पर्यंत दक्षिण सातारा

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली शाखा तासगांव यांचेमार्फत संस्था कर्जपुरवठा घेत व करीत होती. सन १९६१ नंतर या बँकेचे नाव बदलले गेले. ते " सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली " असे झाले. सन १९६७ नंतर या बँकेची शाखा भिलवडी येथे स्थापन झालेमुळे पुढील काळात संस्थेचे बँक व्यवहार भिलवडी शाखेशी निगडीत राहिले.

संस्थेने सभासदांच्या मागणीनुसार तसेच त्यांचे गरजेसाठी सन १९५९ पासून खतविभाग आणि तेलविभाग चालू केले. याबरोबरच १९६० पासून एक ग्राहक भांडारही स्थापन केले व त्यानुसार सभासदांची जीवनावश्यक वस्तूंची गरज भागविली जाऊ लागली. संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रामधील शेती विकासाची जबाबदारी कर्जपुरवठा, खतपुरवठा याबरोबरच इतर मार्गांनीही उचलली.आहे. उदा.शेतीउपयुक्त अवजारे, औषध फवारणी पंप, ट्रॅक्टर मशागत इत्यादि भाड्याने पुरविण्याचीही व्यवस्था केली. त्यामुळे सभासद व बिगर सभासद शेतक-यांना योग्य दरामध्ये शेती निविष्टी उपलब्ध झाल्या. तसेच शेतीविषयक योग्य मार्गदर्शनही शेतक-यांना उपलब्ध करून देण्याची सोय संस्थेने केली. १९६२-६३ पासून संस्थेने विमा एजन्सी घेतली व एकाच वर्षात अंदाजे १ लाख रु.पर्यंतचा विमा उतरविण्याचे कार्य केले. हे कार्य सर्वसाधारणपणे इतर कुठेही सहकारी संस्थेने हाती घेतलेले नाही.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने १९६० ते १९७० या दशकात कर्जपुरवठयाच्या कार्याव्यतिरिक्त पुढील विभाग स्थापन करून त्यांची वाढ केली.

१) <u>खतविभाग:</u>

हा विभाग संस्थेने १९६० पूर्वीच चालू केला आहे. त्यानुसार आवश्यक रासायनिक खते, जंतूनाशके इ.वस्तूंचा पुरवठा शेतक-यांना केला जातो.

सभासदांची शेती अधिकाधिक बागाईत होत असलेले रासायनिक खतांची मागणी वाढली तसेच कर्जपुरवठयामधून मालस्वरूपी कर्ज हे खतांच्या माध्यमातूनच दिले जाते. त्यामुळे खतांची विक्री फार मोठया प्रमाणात वाढत गेली. ती पुढील आकडयावरून दिसून येते.

तक्ता क्रमांक २.८

-: संस्थेची खतविक्री :-

| वर्ष | खतविक्री रू. | नफा रू. |
|---|---|---|
| १९६०-६१ | २२९१९६ | ४९७६ |
| १९६१-६२ | १३७१२५ | ४४४८ |
| १९६२-६३ | ९३०१३ | १३६२ |
| १९६३-६४ | ३०४२८० | ५८१९ |
| १९६४-६५ | ४२३५१४ | ५०६० |
| १९६५-६६ | ३७१८८७ | उपलब्ध नाही |
| १९६६-६७ | ५७८०३७ | ४३०० |
| १९६७-६८ | ९८४८२३ | १२२९६ |
| १९६८-६९ | १२१५४२४ | २०१४५ |
| १९६९-७० | १०७९७८४ | उपलब्ध नाही |

सन १९६० ते १९७० या दहा वर्षामध्ये सलग खतविक्री व त्यामधून मिळालेला नफा वाढत गेला आहे हे दिसून येते.

२) तेलविभाग:

पाणीपुरवठयासाठी ऑईल इंजिन पंपसेट सभासदांनी बसविले. या इंजिनच्या तेलाची गरज सभासदांना होती. जवळपासचे भागात असे इंधन सहजासहजी उपलब्ध होत नव्हते. यासाठी संस्थेने १९६० पासून स्वतंत्र तेलविभाग स्थापन केला. या विभागातून सर्व प्रकारच्या इंधन तेलांचा पुरवठा संस्था सभासद, बिगर सभासदांना करून लागली. १९६५-६६ नंतर नदीवरील पंपसेटसाठी वीजपुरवठा करण्यात येऊ लागला त्यामुळे इंधन मागणी कमी होऊ लागली. पुढील काळात या विभागाचा फायदा कमी होऊ लागला व व्यवहारही कमी झालेले दिसून येतात.

१९६० साली या विभागाकडील विक्री ५३३२३ रू.इतकी झाली होती तर १९६३ साली ९७८८६ रू.आणि १९६५ मध्ये १४०८८२ रू.इतकी वाढली. १९६७-६८ मध्ये १३१५९१ रू., १९६८-६९ मध्ये १०६८०१ रू. इतकी तेलविक्री झाली. या आकडयावरून असे निदर्शनास येते की १९६५ पर्यंत तेलविक्री वाढत गेली आणि पुढील पाच वर्षात १९७० पर्यंत ही विक्री कमीकमी होत आली आहे.

३) ग्राहकभांडार:

संस्थेने १९६१-६२ पासून सभासदांना आवश्यक अशी धान्यविक्रीची सुरूवात केली व यामध्येच नंतर वाढ करून सभासद-बिगर सभासदांना आवश्यक अशा जीवनावश्यक वस्तूंची विक्री व्यवस्था करणेसाठी ग्राहक भांडार विभाग निर्माण करण्यात आला. या ग्राहक भांडारातर्फे सरकारकडून पुरविल्या जाणा-या स्वस्त नियंत्रित दरातील धान्य, साखर, खाद्यतेल यांची विक्री केली जाऊ लागली.

या विभागातून पहिल्याच वर्षी ६५९२ रु.ची धान्यविक्री केली. यामधून नफा नाममात्रच उरला. १९६३-६४ यावर्षी १५०८०१ रु.इतकी विक्री होऊन नफा रु.९२७ इतका झाला. १९६६-६७ साली २०७०१७ रु. इतकी विक्री झाली. अशात-हेने ग्राहक भांडार हा विभागही अत्यंत चांगल्या प्रकारे विकसित झाला.

४) आयुर्विमा महामंडळाची विमा एजन्सी:

१९६२-६३ पासून संस्थेने स्वत:चे नावावर विमा एजन्सी घेतली व असा वैयक्तीक स्वरूपाचा व्यवसायही सहकारी संस्था योग्यरित्या करू शकते हे दाखवून दिले. पहिल्याच वर्षी संस्थेने १ लाख रु.किंमतीचा विमा उतरविला व त्यामध्ये ७३२ रु.कमिशन मिळविले. सभासदांचे व इतरांचे वैयक्तीक विम्याबाबत महत्व पटवून दिले. याबरोबरच मोटरपंप, गाई-म्हैशी, बैल अशी उपयुक्त जनावरे यांच्या विम्याचेही महत्व पटवून दिले जाते व त्यांना विम्याचे संरक्षण दिले जाते. १९६३-६४ मध्ये संस्थेला १९२३ रु. इतके विमा कमिशन मिळाले. १९६४-६५ साली रु.१९३८ इतके कमिशन मिळाले. अशात-हेने वैयक्तीक आणि इतर महत्वाच्या वस्तू, जनावरे यांचा विमा उतरविण्याचे कार्य संस्था करते. ग्रामीण भागामध्ये संस्थेचे असे कार्य महत्वाचे ठरले आहे.

अशाप्रकारे अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने सभासदांचे गरजेनुसार विविध कार्य हाती घेऊन त्यांचा विस्तार केला आहे. याशिवाय पुढील तक्त्यावरून १९६० ते १९७० या काळामध्ये संस्थेची एकूण प्रगती कशाप्रकारे झाली हे निदर्शनास येऊ शकेल.

तक्ता क्रमांक २.९

-: १९६० ते १९७० या काळातील अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेची प्रगती - वाढीचे कांही निदर्शक :-

(सभासदसंख्या सोडता आकडे रूपयात )

| तपशील | १९६०-६१ | १९६१-६२ | १९६२-६३ | १९६३-६४ | १९६४-६५ | १९६५-६६ | १९६६-६७ | १९६७-६८ | १९६८-६९ | १९६९-७० | वृध्दीदर (टक्के ) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) सभासदसंख्या | २६० | २८५ | ४३३ | ४१९ | ५७४ | ५१० | ७४६ | ८२५ | ९२१ | १०१५ | १६.३ टक्के | |
| २) भागभांडवल | ६६६१५ | १२२१०५ | १५२८१५ | २२०६३० | ३०४३७० | ४०७६५५ | ४७७८१५ | ६४८८६५ | ८६४०१० | १०२९२७० | ३५.५ टक्के | |
| ३) ठेवी | १२३१ | २२५५० | २४४४३ | ४९३१७ | ७६११३ | १२६०६० | ८८७८८ | १४८४६७ | ४१६४०१ | १६०१४२ | ७१.६ टक्के | |
| ४) बँक कर्ज | ५०८७१० | ३१७५४७ | ३६५२४० | ९४५३९० | ९९४७०१ | ११५०३१० | १५७८५८२ | १९३६७९५ | २४८६७१० | २४६८३७१ | १९.२ टक्के | |
| ५) सभासदांना कर्जपुरवठा | ५९२३०७ | ४३७८४५ | ५२२७५० | १०००५९४ | ११३९९८६ | ११४९७६८ | १८४८५८३ | २२१७९७४ | २३०९४५२ | २७२७६४१ | १८.४ टक्के | |
| ६) खेळते भांडवल | ६८३५१० | ५७९००० | ५९९५८४ | १३३६५०० | ५६४६५४ | १८२३१५० | २३४९९५६ | ३०८१५८५ | ४३८६२५५ | ४२२४३६६ | २२.४ टक्के | |
| ७) थकबाकी | ० | ० | ० | ० | ० | ० | २५९०३ | ० | ० | १४६११५ | २७४.८ टक्के | |
| ८) नफा | ८३५ | ३३५५४ | १७७३८ | ११२५० | ३६२७३ | ५८७३२ | ३४८२५ | ८०१८५ | ७६४३५ | १४४०७० | ७७.२ टक्के | |

तक्ता क्रमांक २.९ मध्ये दाखविलेल्या संस्थेच्या प्रगतीचे विवेचन पुढील मुद्यानुसार करता येईल.

१) <u>सभासदसंख्या:</u>

१९६० ते १९७० या काळामध्ये सभासदसंख्या चार पटीने वाढल्याचे दिसून येते. १९६०-६१ साली फक्त २६० इतके सभासद होते तेच १९६४-६५ साली ५७४ इतके झाले. १९६७-६८ साली ८२५ सभासद होते ती संख्या वाढून १९६९-७० मध्ये १०१५ इतकी झाली. या काळामध्ये सभासद वाढण्याचे महत्वाचे कारण म्हणजे अंकलखोप गावची शेतीव्यवस्थाच या काळात बदलत गेली. जिराईत शेतीचे रूपांतर बागाईत शेतीमध्ये झाले. ऊसासारख्या बागाईत पिकाला जास्त खर्च येऊ लागला तसेच त्यासाठी खते वगैरे आवश्यक ठरले. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांस आणि मोठया जमिनदारांनाही संस्थेचे महत्व कळून आले. त्यामुळे संस्थेची सभासदसंख्या झपाटयाने वाढत गेली. सभासद संख्या वाढविण्यामागे संस्थेचे अध्यक्ष-संचालक मंडळ यांचेही प्रयत्न कारणीभूत ठरले. १९६० ते १९७० या दहा वर्षांचे एकूण काळामध्ये सभासद संस्थेचा वार्षिक वृध्दीदर १६.३ टक्के इतका होतो.

२) <u>भांडवल:</u>

सहकारी पतसंस्थेला त्या संस्थेच्या भागभांडवलाच्या प्रमाणात जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्जपुरवठा केला जातो. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या कर्जाची गरज मोठया प्रमाणात होती, परंतु भागभांडवल कमी होते. १९६०-६१ मध्ये सभासदांचे भागभांडवल ५८४४० रू.इतके होते.याबरोबर सरकारकडूनही ९००० रू.चे भागभांडवल मिळाले होते. भागभांडवल वाढविण्यासाठी सभासदांना केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठयामधून १० टक्के रक्कम कपात करून ती त्यांचे शेअरखाती जमा करण्याचे धोरण १९६०-६१ पासूनच स्विकारण्यात आले. त्यामुळे पुढील काळात संस्थेचे भागभांडवल जलदगतीने वाढल्याचे दिसून येते.

सन १९६०-६१ साली सभासदांचे व सरकारी भाग मिळून एकूण भागभांडवल रू.६६६१५ इतके होते. ते १९६१-६२ मध्ये रू.१२२१०५ पर्यंत वाढले. १९६३-६४ ला रू.२२०६३० रू.तर १९६४-६५ ला ३०४३७० रू.इतके भागभांडवल होते. सन १९६५-६६ ला रू.४०७६५५ इतके व १९६७-६८ ला रू.६४८८६५ इतके होते ते १९६९-७० साली रू.१०२९२७० पर्यंत वाढले (तक्ता क्रमांक २.९). अशात-हेने अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे भागभांडवल १९६० ते १९७० या काळात अत्यंत जलदगतीने वाढले. या एकूण काळातील भागभांडवलाचा वार्षिक वृध्दीदर ३५.५ टक्के इतका आहे.

३) <u>ठेवी:</u>

संस्थेकडे असणा-या ठेवीमध्ये सभासदांबरोबरच बिगर सभासदांच्या ठेवींचाही समावेश आहे. १९६०-६१ साली संस्थेकडे एकूण ठेवीची रक्कम रू.१२३१ इतकी होती. एकाच वर्षामध्ये म्हणजे १९६१-६२ ला एकूण ठेवीची रक्कम २२५५० रू.पर्यंत वाढली. १९६४-६५ यावर्षी ७६११३ रू.इतकी ठेव होती. १९६७-६८ साली रू.१४८४६७ इतकी असणारी ठेव १९६९-७० पर्यंत रू.१६०१४२ पर्यंत वाढली (तक्ता क्रमांक २.९). अशात-हेने १९६० ते १९७० याकाळात अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेकडील ठेव अत्यंत जलदगतीने वाढलेली आहे.

संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये बिगर सभासदांचा ठेवीचे प्रमाण अगदीच अल्प स्वरूपात आहे. १९६०-६१ मध्ये ५०२ रू. अशी ठेव होती. एकूण ठेवीशी ४०.७८ टक्के असे प्रमाण होते. १९६९-७० पर्यंत एकूण ठेवीशी बिगर सभासदांच्या ठेवीचे प्रमाण सतत कमी झाले आहे. १९६६-६७ यावर्षी १७७२२ रू.इतकी ठेव होती त्याचे एकूण ठेवीशी प्रमाण ११.९६ टक्के होते. १९६७-६८ यावर्षी ३७६९ रू.तर १९६८-६९ साली रू.४८३८ इतकी

ठेव होती. त्याचे एकूण ठेवीशी प्रमाण अनुक्रमे २.५४ टक्के व १.१६ टक्के असे.होते. यावरून बिगर सभासदांच्या ठेवीचे प्रमाण कमी हे झाले परंतु याच काळात एकूण ठेवीत मात्र मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. या काळातील ठेवीचा वार्षिक वृध्दीदर ७१.६ टक्के इतका आहे.

४) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली या बँकेकडील घेतलेले कर्ज:

सभासदांची कर्जाची गरज पूर्ण करण्यासाठी बँकेकडील घेतलेल्या कर्जाच्या आकडेवारीवरून संस्था प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. १९६०-६१ साली बँककर्ज ५०८७१० रू.इतके होते. ते १९६३-६४ यावर्षी ९४५३९० रू.इतके झाले. १९६४-६५ नंतरचे पुढील काळात या कर्जरकमेत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. १९६६-६७ साली रू.१५७८५८२ इतके बँक कर्ज होते. ते १९६८-६९ साली रू.२४८६७१० इतके झाले. १९६५ नंतर बँक कर्जामध्ये जास्ती वाढ होण्याचे प्रमुख कारण म्हणजे बँकेकडून संस्थेला मध्यममुदती कर्जपुरवठाही आवश्यक प्रमाणात करण्यात येऊ लागला तसेच सभासदांचीही अल्प व मध्यममुदती कर्जासाठीच्या मागणीत वाढ झाली होती.

५) संस्थेने सभासदांना केलेला कर्जपुरवठा:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था सभासदांना अल्पमुदत व मध्यममुदत कर्जपुरवठा करते. संस्थेच्या एकूण पीक कर्जात ऊसपीकासाठी दिलेल्या कर्जाचे प्रमाण सुमारे ८५ टक्के इतके आहे. याबरोबरच हायब्रीड, ज्वारी, गहू व इतर पिकासाठी कर्जपुरवठा केला आहे. तसेच मोटरपंपसेट खरेदी, लहान पाणीपुरवठा योजना, सिमेंट पाईप, गाई-म्हैशी खरेदी इ. कारणाकरिता सभासदाना मध्यममुदत कर्जपुरवठाही केला आहे.

## तक्ता क्रमांक २.१०

### -: १९६० ते १९७० या काळातील कर्जपुरवठा :-

(आकडे रूपयात)

| वर्ष | अल्पमुदत कर्जपुरवठा | मध्यममुदत कर्जपुरवठा | एकूण कर्जपुरवठा |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | ५९२३०७<br>(१००.०० | ०<br>- | ५९२३०७<br>(१००.००) |
| १९६१-६२ | ४३७८४५<br>(१००.००) | ०<br>- | ४३७८४५<br>(१००.००) |
| १९६२-६३ | ४१८११५<br>(७९.९९) | १०४६००<br>(२०.०१) | ५२२७५०<br>(१००.००) |
| १९६३-६४ | ९०९०२२<br>(९०.८५) | ९१५७२<br>(९.१५) | १००५९४<br>(१००.००) |
| १९६४-६५ | १०८०४५६<br>(९४.७८) | ५९५३०<br>(५.२२) | ११३९९८६<br>(१००.००) |
| १९६५-६६ | ११११२१८<br>(९६.६५) | ३८५५०<br>(३.३५) | ११४९७६८<br>(१००.००) |
| १९६६-६७ | १५४४७५०<br>(८३.५६) | ३०३८३३<br>(१६.४४) | १८४८५८३<br>(१००.००) |
| १९६७-६८ | २१३९१६७<br>(९६.४६) | ७८४०७<br>(३.५४) | २२१७५७४<br>(१००.००) |
| १९६८-६९ | २०६४३६३<br>(८९.३९) | २४५०८९<br>(१०.६१) | २३०९४५२<br>(१००.००) |
| १९६९-७० | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | २७२७६४१<br>(१००.००) |

सन १९६५-६६ नंतरचे काळात १९७० पर्यंत अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने केलेल्या एकूण कर्जपुरवठयामध्ये जलद गतीनेवाढ झाल्याची दिसून येते (तक्ता क्रमांक २.१०). १९६१-६२ यावर्षी संस्थेने सभासदांना रू.४३७८४५ इतका कर्जपुरवठा केला तर १९६४-६५ यावर्षी एकूण कर्ज रू.११३९९८६ इतके देण्यात आले. १९६९-७० साली रू.२७२७६४१ इतका कर्जपुरवठा करण्यात आला होता. १९६०-६१ आणि १९६१-६२ यावर्षी मध्यममुदत कर्ज दिलेले नाही. सरासरी ८५ टक्के कर्जपुरवठा अल्पमुदत तर १५ टक्के कर्जपुरवठा मध्यम-मुदतीचा दिलेला आहे. १९६० ते १९७० या काळात एकूण कर्जपुरवठयाचा वार्षिक वृध्दीदर १८.४ इतका आहे (तक्ता क्रमांक २.९).

कर्जपुरवठयामधून रोख रक्कम, रासायनिक खते, बियाणे, जंतुनाशके यांचा पुरवठा सभासदाना केला आहे. तत्कालीन " अधिक धान्य पिकवा " या योजनेखाली महाराष्ट्र सरकारच्या योजनेचा भाग म्हणून हायब्रीड ज्वारी पिक मोहिमेची कर्जविषयक जबाबदारीही संस्थेने घेतली होती. १९६० ते १९७० या काळात एकूण कर्जपुरवठयात सुमारे ४$\frac{१}{२}$ पटीने वाढ झालेली आहे.

६) खेळते भांडवल:

सन १९७० पर्यंतच्या काळात खेळते भांडवल वाढले आहे. १९६० ते १९७० या काळात सुमारे सहापटीने वाढ झालेली आहे. अशात-हेने या काळात खेळत्या भांडवलात वाढ झाली त्याची महत्वाची कारणे म्हणजे संस्थेचे भागभांडवल व ठेवी मोठयाप्रमाणात वाढल्या तसेच कर्जमागणी वाढल्यामुळे बँकेकडून जास्तीतजास्त कर्ज घेण्यात आले. संस्थेने इतर विभाग स्थापन केल्यामुळेही एकूण आर्थिक व्यवहार जास्त वाढले. या काळातील खेळत्या भांडवलाचा वार्षिक वृध्दीदर २२.४ टक्के इतका आहे.

१९६०-६१ साली फक्त ६८३५१० रु.इतकेच खेळते भांडवल होते तेच १९६५-६६ साली १८२३१५० रु.इतके झाले. १९६१-६२ आणि १९६२-६३ साली इतर वर्षाची तुलना करता खेळते भांडवल कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते. १९६७-६८ यावर्षी रु.३०८१५८५ इतके असणारे खेळते भांडवल १९६८-६९ यावर्षी रु.४३८६२५५ इतके वाढले. अशात-हेने सर्वसाधारणपणे पाहता १० वर्षामध्ये संस्थेचे खेळते भांडवल सतत मोठया प्रमाणात वाढत गेले आहे. यावरून संस्थेचे आर्थिक व्यवहार वाढून संस्थेची प्रगती झाल्याचे निदर्शनास येते.

७) थकबाकी:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे महत्वाचे वैशिष्टय मानावे ते म्हणजे कर्जपुरवठा मोठया प्रमाणात असूनही थकबाकी शून्य असणे हे होय. थकबाकी नसल्यामुळे संस्था पुढील वर्षी जादा प्रमाणात कर्जपुरवठा करू शकते.

१९६० ते १९७० या दहा वर्षाच्याकाळात फक्त १९६६-६७ आणि १९६९-७० यावर्षीच थकबाकी दिसून येते. या थकबाकीचे त्या वर्षाच्या कर्जपुरवठयाशी शेकडा प्रमाण अनुक्रमे १.४० टक्के व ५.३५ टक्के इतके आहे. इतर सर्व वर्षामध्ये थकबाकी शून्य आहे. थकबाकी नसण्याचे कारण म्हणजे संस्थेची कर्जवसुली लिंकींग पध्दतीने होते. संस्थेच्या बहुतेक सर्व सभासदांचा ऊस शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,सांगली या कारखान्यास दिला जातो व त्यांची ऊसबीले सदर संस्थेमार्फत दिली जातात. यामुळे संस्थेस कर्जवसुली करणे सोपे होते. सर्वसाधारणपणे ९० टक्के वसुली ही साखर कारखान्यामार्फत लिंकींगने होते.

८) नफा:

१९६० पासून संस्थेने कर्जपुरवठयाशिवाय इतर व्यवहारही हाती घेतले. कर्जपुरवठयामध्येही प्रचंड वाढ झाली. एकूण आर्थिक व्यवहार मोठया प्रमाणात वाढले त्यामुळे संस्थेच्या १००० रू.चे दरम्यान असणारा नफा ५०,००० रू.चे वर गेल्याचे दिसून येते. १९६०-६१ साली फक्त ८३५ रू.इतकाच नफा होता तोच १९६१-६२ ला ३३५५४ रू.इतका झाला. १९६५-६६ साली रू.५८७३२ इतका होता तर १९६७-६८ साली रू.८०१८५ पर्यंत वाढला. १९६९-७० यावर्षी रू.१४४०७० इतका मोठा नफा झाला. १९६० ते १९७० या काळात नफ्याचा वार्षिक वृध्दीदर ७७.२ टक्के इतका आहे (नक्ता क्रमांक २.९). १९६३-६४ हे वर्ष सोडता इतर वर्षी संस्थेचा नफा सतत वाढला आहे.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप या संस्थेचे आणखी वैशिष्टय म्हणजे सहकारी खात्याकडून सहकारी संस्थेला देण्यात येणारा ऑडीट वर्ग. या संस्थेने सातत्याने " अ " वर्ग मिळविला आहे. यामुळे सहकारी खात्याच्यादृष्टीनेही ही संस्था आदर्श अशी आहे.

-०-०-०-०-

(संदर्भ:- अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप या संस्थेचे उपलब्ध वार्षिक अहवाल आणि कार्यालयीन कागदपत्रे).